प्रेस/मिडीया

पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

मिल कॉर्नर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर
पिन-431001. दुरध्वनी क्रमांक 0240-2240591
ई-मेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

जा.क्र. वि.स.नि.कक्ष/मनाई आदेश/2024- 186 छत्रपती संभाजीनगर, दि. 17/11/2024

## भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) (3) मनाई आदेश

आदेश:-

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोगाने दिनांक 15/10/2024 रोजीच्या प्रसिध्दि पत्रकान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 चा कार्यक्रम जाहीर केलेला असुन त्यानुसार आदर्श आचार संहिता लागु झालेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघाचे मतदान दिनांक 20/11/2024 रोजी होणार आहे. विधानसभा मतदार संघामध्ये पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहरातील 106-फुलंब्री, 107- औरंगाबाद (मध्य), 108 औरंगाबाद (पश्चिम), 109-औरंगाबाद (पुर्व), 111- गंगापुर, या विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

ज्याअर्थी विधानसभा निवडणुक 2024 च्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात कोणीही व्यक्ती मतदानाच्या दिवशी मा. भारत निवडणुक आयोग यांनी मतदान प्रक्रियेकरिता ठरवुन दिलेल्या शाईचा, EVM मशीन व इतर निवडणुक प्रक्रियेत वापरात येणा-या साहीत्या सारख्या दिसणा-या वस्तुचा वापर करुन मतदानाच्या दिवशी गैरकृत्य करुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो असे माझ्या निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी मी प्रविण पवार, पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (1) (3) मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 च्या मतदानाच्या दिवशी म्हणजेच (दि.20/11/2024 रोजी) मतदान प्रक्रियेकरिता ठरवुन दिलेल्या शाईचा, EVM मशीन व इतर निवडणुक प्रक्रियेत वापरात येणा-या साहीत्या सारख्या दिसणा-या वस्तुचा वापर करुन मतदानाच्या दिवशी गैरकृत्य करण्यास मनाई करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास त्या व्यक्ती विरुध्द भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 (ब) अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलीस उप-आयुक्त, विभागाचे सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणे /शाखा प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

मी पुढे असेही नमुद करतो की, सदरच्या आदेशाची नोंद ही कार्यालयीन राजपत्रात समाविष्ट करण्यात येईल किंवा छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील दर्शनीय ठिकाणी चिटकावून ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर करण्यात येईल.

सदरचा आदेश हा दिनांक 20/11/2024 रोजीचे सकाळी 06.00 ते मतदान प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर आदेश माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक /11/2024 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जाहीर करण्यात आला आहे.

COMMISSIONER OF POLICE
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

16/11

**( प्रविण पवार )**
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

**प्रति** :-

3. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,परिमंडळ 1 व 2, छत्रपती संभाजीनगर.
4. सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.
3. सर्व पो.स्टे.प्रभारी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर **यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

**प्रत** :-

3) मा. विभागीय आयुक्त, कार्यालय छत्रपती संभाजीनगर
4) जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
3. उपायुक्त,गु.अ.वि.(गुप्तवार्ता) छत्रपती संभाजीनगर.
4. जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
5. केंद्र संचालक, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर.
6. सोशल मिडीया,गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर.